म. फुले यांची कविता - डॉ. काळे

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

अ. [illegible]

IMPACT FACTOR 6.10

ISSN 2229-4406

UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XIX, Vol. III
Year - X (Half Yearly)
Sept. 2019 To Feb. 2020

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur(M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Rajendra R. Gavhale
Head, Dept. of Economics,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldhana

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management
Hyderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Prashant Kshirsagar
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya
Kaij, Dist. Beed (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY EDITOR**

Dr. N. G. Mali
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Scanned with CamScanner

ISSN -2229-4406

International Registered & Recognized

Research Journal Related to Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

MEMBERS OF EDITORIAL BOARD

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya, Bansarola,
Tq. Kej. Dist. Beed.(M.S.)

Dr. Milind Lokhande
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College,
Nanded, Dist. Nanded. (M.S.)

Dr. Premchand Sirsat
Dept. of Zoology,
Mrs. K.S.K. Mahavidyalaya, Beed.(M.S.)

Dr. Baswaraj Nagalgave
Head, Dept. of Geography,
P.D.U.Mahavidyalaya,Deoni,Dist. Latur.(M.S.)

Dr. Balaji Ghavale
Head Dept. of Pali,
P.A.D.H. College, Ranisawargaon,
Dist. Parbhani.(M.S.)

Dr. Unmesh Shekde
Head, Dept. of Marathi,
Swami Vivekanand College,
Shirur Tajband, Dist. Latur.(M.S.)

S.K. Gaike
Dept. of Sociology,
Vasant Mahavidyalaya, Kaij, Dist. Beed(M.S.)

Rajesh S. Deshmukh
Head, Dept. of Botany,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

Prashant Mothe
Dept. of English, Aadarsh College,
Omerga, Dist. Osmanabad. (M.S.)

S.B. Phad
Head, Dept.of Poli. Sci., N.S.B. College,
Nanded, Dist. Nanded.(M.S.)

Prof. Johrabhai B. Patel
Head, Dept. of Hindi,
S.P. Patel College, Simaliya,
Godhra (Gujrat).

Dr. Prashant Salve
Dept. of Commerce,
Babuji Avhad College,
Pathardi, Dist. Ahmadnagar.(M.S.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhayalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Kiran Dande
Head, Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College, Latur,
Dist. Latur.(M.S.)

Dr. Vinod Veer
Dept. of Geography,
Kisanveer Mahavidyalaya,
Wai, Dist. Satara.(M.S.)

Nanasaheb Manale
Head, Dept. of History,
Arts College, Dhoki, Dist. Osmanabad.(M.S.)

Dr. G. V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatam Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. Shrirang P. Wattamwar
Head, Dept. of Hindi,
Sharadchandra College, Naigaon,
Dist. Nanded. (M.S.)

Vijayalaxmi Dhanure
Dept. of English,
Chandrabhanu Sonwane College,
Latur, Dist. Latur. (M.S.)

Scanned with CamScan

ISSN -2229-4406

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

PEER REVIEW COMMITTEE

Dr. D. Raja Reddy (Medicine)

Dr. E. Siva Nagi Reddy (Archaeology)

Bhujang R. Bobade (Archaeology)

Dr. Prashant Salve (Commerce)

Dr. Jarachand Yadav (Economics)

Dr. Balaji Kamble (Economics)

Dr. R.K. Ipper (Economics)

Dr. Omshiva V. Ligade (History)

Prashant Kshirsagar (Marathi)

Dr. Vinod Veer (Geography)

Dr. Baswaraj Nagalgave (Geography)

A.J. Barkade (Geography)

Dr. Balaji S. Bhure (Hindi)

Prof. Johrabhai B. Patel (Hindi)

Shivaji Vidhya (Hindi)

Dr. Murlidhar Lahade (Hindi)

Dr. Shrirang P. Wattamwar (Hindi)

Dr. Milind Lokhande (Zoology)

Dr. Premchand Sirsat (Zoology)

Dr. Yutaka Takamine (Law)

Scott A. Venezia (Social Wrok)

Dr. Babasaheb M. Gore (Education)

Dr. Unmesh Shekde (Marathi)

Dr. R. V. Gavhale (Economics)

Ganesh Vaykos (Psychology)

Omprakash Madansure (Sanskrit)

Dr. Balaji Ghavale (Pali)

Dr. Khanderavaji Kale (Sociology)

Prashant Kshirsagar (Marathi)

Rajesh S. Deshmukh (Botany)

Prashant Mothe (English)

Sandip J. Nikam (English)

Vijayalaxmi Dhanure (English)

Dr. G. V. Menkudale (Dairy Science)

Kiran Dande (Dairy Science)

Nanasaheb Manale (History)

Dr. C.J. Kadam (Physics)

S.B. Phad (Political Science)

Scanned with CamScan

ISSN -2229-4406

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

## ADVISORY BOARD

Dr. D. Raja Reddy (Hyderabad)
Dr. E. Siva Nagi Reddy (Hyderabad)
Bhujang R. Bobade (Hyderabad)
Dr. Jarachand Yadav (Beed)
Dr. Balaji Kamble (Latur)
Dr. Omshiva V. Ligade (Latur)
A.J. Barakade (Solapur)
Dr. Sadanand H. Gone (Latur)
Dr. Balaji S. Bhure (Latur)
Prashant Kshirsagar (Beed)
Shivaji Vidhya (Parbhani)
Dr. Murlidhar Lahade (Beed)
Dr. Milind Lokhande (Nanded)
Dr. Baswaraj Nagalgave (Latur)
Dr. Premchand Sirsat (Beed)
Dr. T.G. Shirai (Hingoli)
Dr. Shivanand M. Giri (Latur)
Dr. Yutaka Takamine (Japan)
Scott A. Venezia (U.S.A.)
Johrabhai B. Patel (Gujarat)
Dr. Babasaheb M. Gore (Latur)
Dr. Unmesh Shekde (Latur)
Rajesh S. Deshmukh (Parbhani)
Prashant Mothe (Osmanabad)
Dr. R.K. Ipper (Beed)
Dr. Prashant Salve (Ahmadnagar)
Kiran Dande (Latur)
Sandip J. Nikam (Nashik)
Dr. Vinod Veer (Satara)
Dr. G. V. Menkudale (Latur)
Dr. Shrirang P. Wattamwar (Nanded)
Dr. C.J. Kadam (Latur)
S.B. Phad (Nanded)
Ganesh Vaykos (Parbhani)

Scanned with CamScanner

Issue : XIX, Vol. III
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
ISSN 2229-4406
Sept. 2019 To Feb. 2020

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | A Sociolinguistic Analysis of Maya Angelou's I Know Why the Caged Bird Sings **Purushottam P. Deshmukh** | 1 |
| 2 | A Study of Exclusion of Gender Concerns in Displacement Discourse with Respect to Landi project of Marathwada Region **Usha Sarode** | 8 |
| 3 | Women's Representation in Police Establishment **Dr. Kamalakar S. Waghmare** | 18 |
| 4 | "स्थानिक स्वराज्य संस्था" त्रिस्तरीय रचना - जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यातुन होणारा ग्रामीण विकास **जयश्री सिनगर** | 26 |
| 5 | अमरावती शहराची रुपकिय रचना **डॉ. दिनेशकुमार सिनकर** | 35 |
| 5 | गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक कार्य **नानाचंद ताराचंद वानखेडे** | 42 |
| 6 | राष्ट्रमाता जिजाऊचे हिंदवी स्वराज्य निर्मितीतील योगदान **डॉ. एम. एस. कांबळे** | 48 |
| 7 | संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील मराठवाडयाचे योगदान **डॉ. वी. एस. लासुरे** | 52 |
| 8 | मराठी भाषांतर प्रक्रिया **डॉ. शिवाजी जवळगेकर** | 57 |
| 9 | महात्मा जोतीराव फुले यांची कविता - एक अभ्यास **डॉ. शिवराज काचे** | 67 |
| 10 | "यमुना पर्यटन" मधील यमुनाच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास **रमेश काकडे** | 74 |
| 11 | भारतीय समाजावरील जागतिकीकरणाचा परिणाम **डॉ. डी. एन. दामावले** | 78 |



Scanned with CamScan

(७)

# महात्मा जोतीराव फुले यांची कविता - एक अभ्यास

*डॉ. शिवराज काचे*
मराठी विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

Research Paper - Marathi

आधुनिक महाराष्ट्रातील धर्मप्रबोधनाच्या प्रेरणांची चर्चा करताना प्रा. दि. के. वेडेकर म्हणतात. 'अस्पृश्य गणलेल्या समूहापासून ब्राम्हणांपर्यंत सर्व हिंदूचे नैतिक उन्नयन व्हावे ही फुले यांची धारणा होती.' त्यांचा ब्रम्हमण जातीवरील राग या धार्मिक म्हणजे नैतिक भूमीकेशी सुसंगत होता. 'सार्वजनिक सत्यधर्म' त्यांना प्रेरणा देत होता. सत्य गवसल्याचा दूर अभिमान व प्रेषिताचा गर्व त्यांच्या ठिकाणी नव्हता म्हणूनच ते खऱ्या अर्थाने सत्यशोधक होते. नैतिकतेचा प्रयास हा शोधच असतो. व ती एक जीवनव्यापी प्रेरणा असते. या प्रेरणांचे नाते त्यांच्या काव्या लेखनाशी आहे.

केशवसुत, पूर्व काळातील कविता परंपरा जोपासणारी होती. व इंग्रजी कवितेची वळणे गिरवीत राहणारी होती. ईश्वर गुणानुवाद आणि नित्युपदेश करण्यात दंग असलेली संत कविता, रामायण-महाभारत आदिी महाकाव्यांचे अनुवाद करण्यात आणि त्यातील निवडक आख्याणे मांडण्यात पंतांची कविता दंग होती शृंगार आणि पराक्रमपूजन करणारी शाहिरी कविता होती याचे आवशेष केशवसुत पूर्व काळात आढळतात. इंग्रजी राजवटीबरोबर इंग्रजी विद्येचे अध्ययण सुरु झाले. त्यामुळे जे प्रभावित्त झाले त्यांनी भावगीते सुनीते इ. रुपांतरीत केले.

केशवसुतपुर्वकाळात भक्तीचे उपदेशाचे बोधाचे अध्यात्मिविवेचनाचे साधन म्हणून कवित वाङ्मय प्रकाराचा वापर केला गेला. मा. फुले यांची कविता याच कालखंडातील असले तरी तीचे जातकुळी वेगळी आहे. एक जीवन व्यापी प्रेरणा घेवून त्यानी कविता लिहिली. विचारांची व्यापक मांडणी केली, साम्य परिवर्तनाशी नाते सांगणारी कविता लिहिली. मानवत्वाची प्रतिष्ठा हे सर्वोच्च मूल्य आहे. हे विचार सुत्र मांडणारी कविता त्यानी लिहिली.

"समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषन बंद करुन सर्व मानावांना मुक्त करणारा विचार म्हणजे मानवी हक्काचा विचार होय." असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात.

सर्वकष क्रांतीचे तत्वज्ञान त्यांनी जसे आपल्या गद्य लेखनातून मांडले तसे आपल्या

Scanned with CamScan

कवितेतून ही मांडले. महात्मा फुले यांची कविता प्रयोजनवती होती. तीने वैचारिक प्रबोधन करण्याचे वृत्त स्विकारले होते. ही कविता लोकहितार्थ जन्माला आलेली आहे. सुध्द ज्ञानोपासनेचा ज्ञाननिष्ठेचा विवेकवादाचा पुरस्कार त्यांची कविता करते. मा. फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म हा मनशांतीसाठी नाही. की मोक्ष प्राप्तीसाठी नाही. तर तो मानवी स्वातंत्र्यांसाठी आहे. विषमता अधिष्ठीत चातुर्वण्यावर जन्मजात जातीसंस्थेवर प्रखर हाली करणारी, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही मूल्ये मानणारी तयांची वैचारिक भूमिका कविते प्रकट होते.

'सत्य सर्वांचे आदी घर,
सर्व धर्मांचे माहेर
मानवांचे धर्म नसावे अनेक
स्वभाषा लिहावी, भाषण करावे
सत्याविण नाही जगी अन्य धर्म,
देशधर्म भेद नसावा अंतरी'[१]

महात्मा फुले यांच्या कवितेत मराठी माणसाला आतमस्थितीचे देशस्थितीचे भान आणू दिले आहे. या कवितेचे घराणेच निराळे आहे. विचारांचे आसूड ओढून एकेका प्रस्थापित शत्रुला या कवितेने झोडले आहे. महात्मा फुले यांची कविता लिहिली तिच्यात शिवाजी राजांच्या पोवाड्याचा दस्यूच्या पोवाड्याचा, अभंग व अखंड रचनेचा, ब्राह्मणांचे कसब या काव्यरचनेचा सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांचा समावेश होतो. 'अति महारती क्षत्रियाचा बाळ' हा शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा १८६९ मध्ये प्रसिध्द केला. बहुजनाच्या उपयोगी हा पोवाडा पडावा असाच त्यांचा हेतू होता. शिवाजी राजे यांच्या जीवनातील घटनांचा उल्लेख पवाड्यात आहे शिवाजीच्या पराक्रमाचा गौरव करताना महात्मा फुले लिहितात,

'चतुर सावधपणाला । सोडिले आधी अळसाला'
लहान मोठया पागेला । नाही कधी विसरला
राजा क्षेत्र्यांमध्ये पहिला । नाही दुसरा उपमेला'

जोतीरावांच्या पवाड्याला एका दृष्टीने ऐतिहासि महत्व आहे. क्षत्रियांत शिवाजीसारखा पराक्रमी राजा निर्माण झाला आणि त्याने ब्राम्हणवर्गाने दडपून टाकलेल्या क्षत्रियांच्या क्षात्रतेजास उजळून टाकले. शिवाजीचे वर्णन 'गोब्राम्हण प्रतिपालक हिंदू पादपादशाह' असे हिंदूधर्माभिमानी करतात. पण शिवाजीचे उद्दिष्ट हिंदवी स्वराज्य प्रस्थापित करावे असे होते. आपले राज्य लोककल्याणकारी व्हावे. ही त्यांची इच्छा 'कुळवाडी भूषण' हे शब्द योजण्यामागे शिवाजी हा केवळ गोब्रम्हणप्रतिपालक' राजा नव्हता हे अवर्जून सांगण्याचा म. फुले यांचा हेतू होता. म. फुले यांनी या पवाड्यात लिहिले, ते असे

Scanned with CamScan

"काशीकर गंगाभट घाली डौल धर्माचा
केला खेळ गारुड्याचा
लुटारु शिवाजी लुटला धाक गृहफौजेचा
खर्च नको दारु गोळीचा
वहुरुपी सोगं केला दान सोने घेण्याचा
पवाडा गातो शिवाजीचा"[३]

त्यांचे म्हणणे त्यांच्या ब्राह्मणशाही विषयक भूमिकेशी सुसंगत होते. 'लुटारु शिवाजी' हे शब्द त्यांनी शिवाजीचा अधिक्षेप करण्यासाठी योजलेले नाहीत. शत्रुचा प्रदेश पराक्रमाने लुटणाऱ्या शिवाजी महाराजांना मात्र ब्राह्मणाच्या 'गृहफौजेने' दारु गोळा न वापरता पार लुटून टाकले. धर्माच्या नावाखाली शूद्रातिशुद्रांचे सर्वकष शोषण करणाऱ्या ब्राह्मणशाहीविरुध्द त्यांनी तोफ डागली होती. 'आर्यभट ब्राह्मणांचे कसब' या शीर्षकाखाली २९ 'अखंड'जोतीरावांनी रचली त्यात भट ब्राह्मणाचे त्यांचे ढोग, त्यांची धर्मनीती यांचा कडक उपहास केलेला आहे. ब्राम्हण शूद्रांचा धिक्कार करतात. धर्माच्या नावाखाली शूद्रांचा छळ करतात. खोटे नाटे व्यवहार करतात. कपट कारस्थान करतात. असे विचार मांडून 'या नीचांनी आम्हा नीच केले' असे रोखठोकपणे सांगतात.

'अणीक भटांनी कपटे ती केली ।'
विद्या ती ठेविली ।
आपले हाती आजवर त्यांचे कपट चालले ।
इतरा नाडले जोती म्हणे ।[४]

'ब्राह्मणांचे कसब' या आपल्या लोकहितार्थ लिहिलेल्या पुस्तकात आमच्या देशात ब्राह्मणांचे महत्व किती आहे व ते धमाच्या मिषाने नोकांवर केवढा जुलूम करितात हे प्रसिध्द आहे जे विद्या शिकून सुधारले आहेत. त्यांच्यामध्ये भटजीबुवांचे माहत्म्य दिवसेदिवस कमी होत चालले आहे. परंतु अशी गोष्ट शुद्र जातीत नाही. भिक्षुक वर्ग धर्माच्या नावावर जगत होता. वेगवेगळ्या रुढींचे पालन केले नाही तर पाप लागेल या भितीपोटी ब्राह्मणांची पिळवणूक शूद्रातिशुद्र निमूटपणे सहन करीत होते. जन्म, विवाह, ऋतूशांती, वास्तुशांती, मृत्यू ग्रहणकाल इ. अनेक प्रसंगी ब्राह्मण शूद्रातिशूद्रांना कसे लुबाडत होते. याचे वर्णन केले आहे.ते असे,

'स्नानसंध्या नित्य टिळा टोपीवर
घेती मांडीवर जारीणीस
नेरूनी सोवळे विटाळसा झाला
शिवेना शुद्राला शुध्द कैसा
श्रवण वेदांचे शुद्र बंद केले

मुळी शिकवीतो इंग्लिशांना
भूदेव होऊनी पायां पडविती
पायथी पडती रांडांच्या हो
शुद्राला भोजन दुरुन वाढिती
मद्यपान घेती शाक्तमिषे
पाय धुववणी शुद्रा तीर्थ देती
मुखरस पिती यवनीचा'[५]

धर्माच्या नावावर खुशाल जगणाऱ्या भटभिक्षुकांनी वेश्या गमन केले. मद्यप्राशन केले. नाचगाण्याच्या बैठकीत रंग उधळले आणि त्यामुळे अशी ठकबाजी करणाऱ्या भट भिक्षुकांविरुध्द फुल्यांना कठोरपणे लेखणी उचलावी लागली.

माणसाचे सुख कशात आहे? या प्रश्नाचा शोध घ्यावा असे ज्याला त्याला वाटते. सर्व दुःख पुर्ण आहे दुःख क्षणिक आहे. दुःखाचे निवारण सन्मार्गाचे आचरण केले तर करता येते असे भगवान बुध्द सांगतात. विनोबांजींना एका शिक्षकांने प्रश्न केला की, माणूस केव्हा सुखी होईल? विनोबाजी हजरजबाबी होते ते शिक्षक मित्राला म्हणाले मित्रा व्याकरणातून 'मी' हे सर्वनाम काढून टाक. वस्तुतः त्यांना सूचवाचे होते की अहंकार - मीपणा - हा माणसाच्या दुःखाच्या मुळाशी आहे. कांही तत्वचेते म्हणतात. माणसांच्या दुःखाच्या मुळाशी सर्वप्रकारची तृष्णा आहे या तृष्णेची ही विविध रुपे आहेत.

'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात यशवंत व जोतीराव यांच्यातील संवादातून सत्यधर्माची चर्चा केली आहे. मानवप्राणी एकंदर सर्व जगात कशाने सुखी होईल ? या यशवंताच्या प्रश्नाला जोतीबांचे उत्तर असे की 'सत्यवर्तन' केल्याशिवाय मानव प्राणी जगात सुखी होणार नाही.

'सत्य तोच धर्म करावा कायम
मानवा आराम सर्व ठायी
मानवांचा धर्म सत्य हीच नीती
बाकीची कुनीती, जोती म्हणे'[६]

माणसाने माणसाशी माणसारखे वागावे हाच धम्म होय. असे भगवान बुध्दांनी सांगितले त्याप्रमाणे जोतीरावही म्हणतात की, मानवी समतेचे स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पुजा आहे. म. फुले यांनी 'अखंड' रचले ते जनजागरणासाठी त्यांचे अखंड हे त्यांच्या विचाराचे वाहक होते. ही कविता पारंपरिक मराठी कवितेपेक्षा वेगळी होती. जोतीरावांनी सुरुवातीला 'अभंग' रचना केली आणि मग त्यांनी 'अखंड' हे नाव आपल्या रचनेला दिले. 'अभंग' या रचनाप्रकारामागे जो पारंपारिक अर्थ होता त्यातून आपल्या कवितेला मुक्त करावे म्हणून म. फुले यांनी 'अखंड' हे नाव स्विकारले

Scanned with CamScan

आसावे. जोतीरावांनी परमेश्वर, खुळचट धर्मकल्पना, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली आपले नकाराचे तत्वज्ञान 'अभंग' नावाने यावे हे त्याना बहुवा पटले नसावे म्हणून त्यांनी अभंग सदृश रचनेला 'अखंड' म्हटले असावे. कवितेमागे जोतीरावांचे अखंड व्यक्तिमत्व आहे विचार आणि त्याप्रमाणे आचार हे जोतीरावांचे जीवन सुत्र होते.

आणखी एक असे की, जोतीरावांची कविता मुल्यांची बांधीकी स्वीकारणारी आणि त्यातून 'सार्वजनिक सत्यधर्माची'विचार सुत्रे त्यांनी विशेद केले आहे. 'धर्मराज्यभेद मानवा नसावे' सत्याने वर्तावे, ईशासाठी मानवांचे धर्म नसावे अनेक सार्वभौम सत्य स्वतःआचरावे सत्य वर्तनाने सर्व सुखी होती, सत्याचीणा, नाही जगी अन्य धर्म. जगाच्या कल्याणा देह कष्टवावा. निर्मिके निर्मिले मनुज सकल. सर्व ज्ञानामध्ये आत्मज्ञान श्रेष्ठ अशी किती तरी विचार सुत्रे जोतीरावांने या अखंडातून मांडले आहेत.

शेतकऱ्याला लुटणारा दलाल कोणते शासन नष्ट करु शकले आहे ? त्यामुळे तर शेतीमालाला रास्तभाव मिळवीण्यासाठी शेतकऱ्याला रस्त्यावर यावे लागते. 'कमिशन' उपटणारा मध्यस्थ, मग तो सत्तेवर असो की अन्यत्र असो त्याचे निर्मूलन झाल्याशिवाय उत्पादक शेतकरी सुखी होणार नाही. शेतीवर जगणाऱ्यांचे सर्व बाजूंनी होणारे शोषण केव्हा थांबेल ? त्याला करायला जमीन मालकीची मिळेल आणि रोजगार खात्रीपूर्वक मिळेल आणि आर्थिक सांस्कृतिक संघर्षात ता मूल्ये स्वीकारून ताकदीने उभा राहिल. तेव्हा शेतकऱ्याचे शोषण थांबेल. जोतीरावाने स्वतंत्र शेतकऱ्याचे स्वप्न पाहिले होते. पण वस्तुस्थिती अशी होती की, त्यांना शेतकरी दारिद्र्यात, अज्ञानात पार बुडालेला आहे हे जाणवत होते. एका 'अखंडात' ते शेतकऱ्याची कष्टमयस्थिती वर्णन करतात. ते म्हणतात,

**'काय पुरती लंगोटी । फिरती नांगराचे पाटी**
**एका घोंगड्यावाचूनी । स्त्रियानाही दुजे शयणी**
**ढोरामागे सर्वकाल । पोरे फिरती रानोमाळ**
**ताक कण्या पोट भरी । धन्य म्हणे संसारी**
**असे वस्त्रांची कमती । एकमेका चिकटती**
**सरकारी पट्टी नेट । पडे तीन शेंड्या गाठ**
**कर्जरोखी लिहिणे भट । निर्दय मारवाडी भाट**
**अज्ञान्याला रामजन नाही । कुलकर्ण्याने लिहिले कांही**
**वकिलाची महागाई । न्यायाधीशा दया नाही**
**पापपुण्य जेथे नाही । शापुरते दादाभाई.'**

जोतीरावांच्या लेखनात रोखठोकपणा आहे. त्यांच्या कवितेचा रोखठोखपणा हा धर्मच होता.

Scanned with CamScanner

शुद्र शेतकरी दयनीय स्थितीत येवून पोहचला होता. त्याच्या दयनीय स्थितीची कारणमीमांसा त्यानी केली आहे. आणि शुद्रातीशुद्रानी आपल्या हक्काची जाणीव ठेवावी. व विद्या साध्य करावी. शिक्षण घ्यावे. असे ते आग्रहपूर्वक सांगतात.

मानवाचे हक्क सर्वास कळता ।

मग कोण त्राता आर्यभटा । असे म. फुले विचारतात. शुद्रातीशुद्रांना आपले हक्क ठाऊक नाही हेच त्याचे विपन्नावस्थेचे कारण होय. त्याच्या हाती विद्या नाही हेच आहे. अज्ञान आणि दारिद्र्यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी शिकावे. ग्रंथ वाचन करावे. सत्यधर्माचे पालन करावे. अविद्येने शुद्रातीशुद्राचा घात झाला आहे. म्हणून ते म्हणतात,

'विद्ये विना मती गेली । मती विना नीती गेली ।
नीती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।
वित्त विना शुद्र खेचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।'

जोतीरावांची कविता हे संघर्षाची आहे. हा संघर्ष भट ब्राह्मणांविरुध्द आहे. शोषण करणाऱ्या विरुध्द आहे. त्याच्या अखंडादी काव्य रचनेने समाजमनात संघर्षाची बिजे पेरली. म. फुल्यांचा विचार वर्ण जातीव्यवस्थेचा अंत करणारा होता. विषमता, शोषण, अंधश्रध्दा, निरक्षरता इ. निर्मूलन करण्याचा विचार अपल्या कवितेतून मांडला. समाजात माजलेल्या कर्म कांडांचा, भटाब्राह्मणांनी रुजवलेल्या खोळचट धर्मकल्पनांचा उपहास करताना त्यांची वाणी धारदार बनते. त्यांची कविता विज्ञाननिष्ठेच्या आणि प्रखर बुध्दीवादाच्या तेजात न्हाऊन निघालेली आहे. जोतीरावांनी कविता जनजागरणाच्या प्रेरणेतून जन्मलेली होती. म्हणून ती विषमते विरुध्द आग ओकीत राहिली आणि जनसमूहांच्या दुःखाला त्याच्या फोडीत ती मानव मुक्तीच्या लढ्या गतीमान करु शकली.

**निष्कर्ष :**

१. म. फुले यांच्या कविता उद्‌बोधक आहे.

२. नैतिक उद्‌बोधन आजच्या स्थितीला महत्वाचे ठरते.

३. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षिणक आणि सांस्कृतिक अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नैतिक अद्यःपतन घडून येत आहे. म्हणून म. फुले यांची कविता आजही मार्गदर्शक ठरते.

४. मानवतेची प्रतिष्ठा हे सर्वोच्च मूल्य आहे. हे ठासून त्यांची कविता मांडते.

५. सामान्यजनतेचे शोषण थांबले पाहिजे. समाज शोषणमुक्त झाला पाहिजे. हा विचार सर्व प्रथम फुले यांची कविता मांडते.

६. वर्णव्यवस्थेवर, जातीव्यवस्थेवर प्रहार करते.

७. विषमताविरहीत, समताधिष्ठीत समाज निर्मीती करण्यासाठी आज ही त्यांची कविता महत्वाची ठरते.

Scanned with CamScan

८. शेतकऱ्यांचे शोषण करणारा दलाल नष्ट व्हावा ही अपेक्षा व्यक्त करते.

९. स्वभाषेचा पुरस्कार करते.

१०. सार्वभौम सत्याचा प्रत्येक व्यक्तीने अंगीकार करावा.

११. म. फुले यांना मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातील समीक्षकांनी कवी म्हणून मान्यता दिली नाही.

## संदर्भ सूची :-

१. संपा. धनंजय कीर, स. ग. मालशे -'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९६९. पृ. ३५१.

२. तत्रैव - पृ. ३७.

३. तत्रैव - पृ. ३४.

४. तत्रैव - पृ. ४७६.

५. तत्रैव - पृ. ६४.

६. तत्रैव - पृ. ४५९.

७. संपा. डॉ. प्रल्हाद लुलेकर - 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

Scanned with CamScan

ISSN 2229-4406

ISSN 2229-4406

Published, Printed, Owned by Sow. Mahananda Balaji Kamble & Edited by Balaji Kamble & Printed at Jyotichandra Offset Printing & Binding & Published by Jyotichandra Publication, Gyandev Parvati, R.9/139/6, Near Vishal School, L.I.C. Colony, Pragati Nagar, Latur, Dist. Latur - 413 531 (M.S.) India.

Editor in Chief Dr. Balaji Kamble Mob. No. 9423346918

Scanned with CamScanner